# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- मनपा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांकडून डिजिटल प्रचारावर भर
- राजकीय नेत्यांचे परस्परांविरोधात आरोप प्रत्यारोप शीगेला
- लालूप्रसाद यादव यांच्याविरोधात आरोप निश्चितीचे दिल्ली न्यायालयाचे आदेश
- कांतारा, तन्वी द ग्रेट आणि दशावतारसह विविध चित्रपट ऑस्करसाठी पात्र

आणि

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही. सिंधू उपांत्य फेरीत दाखल

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. उमेदवार तसंच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटलं उपकरणं, तंत्रज्ञानासह विविध माध्यमांचा उपयोग करत आहेत. पदयात्रा, रॅली आणि सभा या पारंपरिक पद्धतींसह निवडणूक प्रचारात आता कृत्रिम बुद्धिमत्तेचाही समावेश झाला आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार करण्यासाठी भाजपाने एआयचा वापर करून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना मतदारापर्यंत पोहोचवण्याची मोहीम सुरू केली आहे. तर काँग्रेस पक्षही समाजमाध्यमाद्वारे मतदारांशी डिजिटल संपर्क साधत आहे. विविध समाजमाध्यम व्यासपीठांचा वापर करत चित्रफीत, रिल आणि मेसेजद्वारे काँग्रेसचे उमेदवार प्रचार करत आहेत.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेशी युती करणं ही मनसेची सर्वांत मोठी चूक असून, या आघाडीमध्ये सर्वाधिक नुकसान मनसेचे होईल, असं मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबई इथं महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. जन्मामुळे मालमत्ता मिळू शकते, पण विचारांचा वारसा मिळत नाही, अशी टीकाही मुख्यमंत्र्यांनी केल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राजकारणातील वैचारिक बांधिलकी कमी होत असून बहुतांश राजकीय पक्षांनी त्यांची मूळ विचारधारा बाजूला ठेवली आहे, असं मत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केलं. पक्षाचे समर्थक वाढवण्यासाठी राजकीय पक्ष विविध मार्ग अवलंबत असल्याबद्दल पवार यांनी चिंता व्यक्त केली.

****

परळी नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि MIM या पक्षांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन केली असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलतांना दानवे यांनी, छत्रपती संभाजीनगर शहराला पाणी देण्याचं मुख्यमंत्र्यांनी काल खोट आश्वासन दिलं, असा आरोप केला.

दरम्यान, शिवसेना नेते संजय शिरसाठ यांनी एमआयएम संदर्भातले आरोप फेटाळून लावले आहेत. शिवसेनाच MIM ला हद्दपार करेल. त्यामुळं त्यांनी अधिक माहिती घ्यावी, असा सल्ला शिरसाठ यांनी दानवे यांना दिला.

****

भाजपचे नेते तथा महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची आज लातूर इथं प्रचारसभा झाली. केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याशिवाय शहराचा विकास नसल्याचं बावनकुळे म्हणाले.

****

लातूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत जनसेवा माथाडी आणि श्रमिक कामगार संघटनेने काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीला पाठींबा दिली आहे. आमदार अमित देशमुख यांना आज याबाबतचं पत्र सुपूर्द करण्यात आलं.

****

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचं यावर्षी पुनर्गठन करण्यात येणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्लीत ही घोषणा केली. या पुनर्गठनामध्ये नवीन कार्यप्रणाली विकसित करण्याचाही समावेश असून सर्जकांच्या नव्या पिढीला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडलं जाणार आहे. दरम्यान वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं क्रिएटर्स कॉर्नरचं उद्घाटन केलं. डिजिटल व्यासपीठांवर सर्जनशील आशयाचं प्रदर्शन आणि प्रसार करणं तसच प्रोत्साहन देणं हा उपक्रमाचा उद्देश आहे.

****

आज प्रवासी भारतीय दिवस साजरा केला जात आहे. ज्यामध्ये भारताच्या विकासात आणि अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या अनिवासी भारतीयांचा सन्मान केला जातो. नऊ जानेवारी १९१५ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते, या घटनेचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि जागतिक स्तरावर देशाचा प्रभाव वाढवण्यात प्रवासी भारतीयांचं योगदान यानिमित्त अधोरेखित केलं जातं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रवासी भारतीय दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांचं कुटुंब आणि इतरांविरोधात जमीन घोटाळाप्रकरणी आरोप निश्चित करण्याचे आदेश नवी दिल्लीतल्या न्यायालयानं दिले आहेतरेल्वेमंत्री असताना लालूप्रसाद यादव यांनी पदाचा गैरवापर करून नोकऱ्यांच्या बदल्यात जमीन मिळवल्याचा आरोप विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी ग्राह्य धरला आहे. २३ जानेवारीपर्यंत आरोप निश्चित करावेत, असं न्यायालयानं सांगितलं.

****

कांतारा – द लिजंट चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टुरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट हे ५ भारतीय चित्रपट, ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चरच्या वतीनं आज ही घोषणा करण्यात आली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे ४ चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारी जाहीर होईल. याशिवाय भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी होमबाऊंड हा चित्रपटही पाठवण्यात आला आहे.

****

भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं मलेशिया ओपन सुपर 1000 स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. आज सिंधूची लढत जपानच्या अकाने यामागुची हिच्याशी झाली. सामना सुरू झाल्यानंतर सिंधूने पहिला गेम २१–११ असा जिंकला. त्यानंतर यामागुची हिला दुखापत झाल्यानं तिनं सामना सोडला. यामुळे सिंधू स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाली. दरम्यान, या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय जोडी सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

****

केंद्र सरकारनं नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं. या योजनेमुळे गावातील पायाभूत सुविधा आणि मुलभूत सेवा सक्षम होणार आहेत अशी माहिती लातूर जिल्ह्यातल्या एकुर्का रोड येथील संजय सोपानराव कांबळे यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – संजय सोपानराव कांबळे**

****

पहिलं राज्यस्तरीय ग्रामीण, कृषी आणि सहकार साहित्य संमेलन येत्या १४ आणि १५ फेब्रुवारी रोजी रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यातल्या मांडकी पालवणमध्ये होणार आहे. संमेलन संयोजन समितीचे अध्यक्ष प्रकाश देशपांडे आणि उपाध्यक्ष अरुण इंगवले यांनी आज रत्नागिरी इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ज्येष्ठ साहित्यिक आणि रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांची संमेलनाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली आहे. ग्रामीण, कृषी आणि सहकार या तिन्ही विषयांतलं नामवंत लेखकांचं साहित्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचावं हा या संमेलनाचा उद्देश आहे.

****

शीखांचे गुरु तेगबहादूर यांच्या ३५० व्या हुतात्मा वर्षानिमित्त नांदेड इथं २४ आणि २५ जानेवारी रोजी विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमासाठी गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसंच श्री सचखंड गुरुद्वारा बोर्डाचे अध्यक्ष डॉ. विजयसिंह सतबीर सिंघ यांनी आज नांदेड इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या सोहळ्यानिमित्त देशभरातून सुमारे दहा लाख भाविक नांदेडला येतील, असा अंदाज आहे.

****

परभणी जिल्ह्यात सेलू इथं संगीतरत्न हरिभाऊ चारठाणकर संगीत महोत्सवाचं उद्या आणि परवा आयोजन करण्यात आलं आहे. साई नाट्यगृहात सायंकाळी साडे पाच वाजता सुरू होणाऱ्या या महोत्सवात विविध नामांकित तसंच उदयोन्मुख कलाकार गायन, नर्तन आणि वादनाचा कलाविष्कार सादर करणार आहेत. महोत्सवाचं हे आठवं वर्ष असून महोत्सव सर्वांसाठी खुला आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या पाटोदा तालुक्यातल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथगड इथं संत वामनभाऊ यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त उद्या विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आमदार धनंजय मुंडे या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर तीन वर्षांत १५ पट परतावा देण्याचे आमिष दाखवत ८३ लाख ७५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी मनी प्लॉट ग्रोथ कंपनी चालक संतोष तुकाराम कोकाटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

****

राज्यात आज अहिल्यानगर इथं सर्वात कमी साडे सात अंश तर तर पुण्यात साडे आठ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात नांदेड इथं नऊ पूर्णांक आठ, छत्रपती संभाजीनगर इथं साडे दहा तर धाराशिव तसंच परभणी इथं अकरा पूर्णांक दोन, दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****